## ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

प्रवेशास इच्छुक विद्यार्थ्याने संकेतस्थळावर नावनोंदणी (Registration) करून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे आवश्यक आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये (CDOE) प्रथमतःच प्रवेश घेणारे विद्यार्थी तसेच मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेतील जुने विद्यार्थी यांना प्रथम वर्ष प्रवेशाकरिता संकेतस्थळावर नावनोंदणी (Registration) करणे आवश्यक आहे. (मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेच्या जुन्या विद्यार्थ्यांना त्यांचा याआधीचा UserID किंवा नोंदणी क्रमांक (PRN) वापरून प्रवेश अर्ज भरता येणार नाही. त्यांना पुन्हा नावनोंदणी करून नवीन UserID घेणे आवश्यक आहे.)

### प्रवेश प्रक्रियेतील महत्वाचे टप्पे

ABC-ID तयार करणे

↓

DEB-ID तयार करणे

↓

नावनोंदणी करणे

↓

तपशील (प्रोफाईल) भरणे

↓

अभ्यासक्रमास अर्ज करणे

↓

अभ्यासक्रम निवडणे

↓

अभ्यास केंद्र निवडणे

↓

माध्यम व विषय निवडणे

↓

ऑनलाईन शुल्क भरणे

↓

प्रवेश अर्ज डाऊनलोड करणे

↓

प्रवेश अर्ज प्रिंट करून त्यास कागदपत्रे जोडणे

↓

निवडलेल्या अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करणे

## ABC-ID / APAAR-ID

ABC-ID / APAAR-ID हा एक कायमस्वरूपी ID असून तो प्रवेशासाठी आवश्यक आहे.

जर विद्यार्थ्याने यापुर्वी (शाळेमध्ये/ महाविद्यालयामध्ये)ABC-ID / APAAR-ID तयार केलेला असेल तर तोच ID प्रवेशासाठी वापरता येईल. (पुन्हा नव्याने ID तयार करण्याची आवश्यकता नाही.)

जर विद्यार्थ्याकडे ABC-ID / APAAR-ID नसेल, तर तो तयार करणे आवश्यक आहे.

ABC-ID / APAAR-ID डिजीलॉकर ॲप <u>किंवा</u> संकेतस्थळावरून तयार करता येईल.

१) डिजीलॉकरमोबाईलॲपवर लॉगीन करून त्यावर APAAR शोधून त्यामध्ये आवश्यक तपशील भरल्यानंतर ABC-ID / APAAR-ID तयार होईल.

<u>किंवा</u>

२) https://www.abc.gov.in/या संकेतस्थळावर Login/Register येथे क्लिक करून, पुढे Student वर क्लिक करून लॉगीन केल्यानंतर आवश्यक तपशील भरल्यानंतर ABC-ID / APAAR-ID तयार होईल.

## DEB-ID

DEB-ID हा एक कायमस्वरूपी ID असून तो प्रवेशासाठी आवश्यक आहे.


जर विद्यार्थ्याने यापूर्वी DEB-ID तयार केलेला असेल तर तोच ID प्रवेशासाठी वापरता येईल (पुन्हा नव्याने DEB-ID तयार करण्याची आवश्यकता नाही.)

जर विद्यार्थ्याकडे DEB-ID नसेल तर, तो https://deb.ugc.ac.in/StudentDEBId या संकेतस्थळावरून पुढीलप्रमाणे तयार करता येईल.

१) विद्यार्थ्याचाABC-ID, आधारकार्डवरील नावाप्रमाणे विद्यार्थ्याचे नाव, आधारकार्डनुसार जन्मवर्ष हा तपशील भरून Self वर क्लिक करावे आणि ठिकाण व Captcha भरून Enter वर क्लिक करावे.

२) ईमेल-आयडी व मोबाईल क्रमांक भरून वरचौकोनावर (Checkbox वर) क्लिक करून पुढे Submit वर क्लिक करावे.

३) वरील पहिल्या मुद्द्यातील प्रक्रिया पुन्हाएकदा पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यास त्याच्या DEB-ID चा तपशील पुढीलप्रमाणे दिसेल:



## नावनोंदणी (Registration):

१) नावनोंदणी http://unipune.ac.in/sol/admission2025.html या संकेस्थळावर करता येईल.

२) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरायच्या लिंकवर क्लिक करावे.

३) Fresher Student वर क्लिक करून New User Register यावर क्लिक करावे.

४) दिलेल्या महत्वाच्या सूचना काळजीपूर्वक वाचून चौकोनावर (Checkbox वर) क्लिक करून OK वर क्लिक करावे.

५) नोंदणी अर्जामध्ये आवश्यक माहिती काळजीपूर्वक भरावी:

a) विद्यार्थ्याचे नाव (spelling) DEB-ID वेबसाईटवरील नावाप्रमाणेच बिनचूक भरावे.
b) विद्यार्थ्याचा आधार क्रमांक बिनचूक भरावा.
c) विद्यार्थ्याची जन्मदिनांक DEB-ID वेबसाईटवरील जन्मदिनांकानुसार भरावी.
d) नावनोंदणीसाठी विद्यार्थ्याने स्वत:चा मोबाईल क्रमांक आणि ईमेल-आयडी वापरावा.
e) मोबाईल क्रमांक टाईप करून Send OTP वर क्लिक करावे. OTP टाईप करून Confirm वर क्लिक करावे.
f) ईमेल-आयडी टाईप करून Send OTP वर क्लिक करावे. OTP टाईप करून Confirm वर क्लिक करावे.
g) CAPTHA टाईप करून I accept the वर क्लिक करावे.
h) प्रवेश अर्जाकरिता वापरावयाचा पासवर्ड टाईप करावा. सदर पासवर्ड ८ ते १५ अक्षरी आवश्यक असून त्यामध्ये
   i. किमान १ UPPER CASE अक्षर,
   ii. किमान १ lower case अक्षर
   iii. किमान १ क्रमांक
   iv. किमान १ विशेष वर्ण (*#@)
   यांचा समावेश असणे आवश्यक आहे.
i) Declaration वर क्लिक करून ते काळजीपुर्वक वाचून Okay वर क्लिक करावे.
j) चौकोनावर (Checkboxवर) क्लिक करून Submit वर क्लिक करावे.
k) स्क्रीनवर UserID / LoginID दिसेल. सदर ID आणि पासवर्ड याची नोंद ठेवून पदवी पूर्ण होईपर्यंत ते जपून ठेवावे.

**येथे नावनोंदणी प्रक्रिया पूर्ण होते.**

# <u>विद्यार्थ्यांचा तपशील (Profile) भरणे</u>

१) विद्यार्थ्यांचा तपशील http://unipune.ac.in/sol/admission2025.html या संकेस्थळावर भरायचा आहे.

२) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरायच्या लिंकवर क्लिक करावे.

३) Fresher Student वर क्लिक करून नावनोंदणीवेळी उपलब्ध झालेले लॉगीन-ID आणि password टाईप करावे.

४) Captcha टाईप करून Login वर क्लिक करावे.

५) दिलेले मुद्दे काळजीपुर्वक वाचून OK वर क्लिक करावे.

Step 1: Basic Details:

अर्जात विचारलेली माहिती काळजीपुर्वक भरून Next वर क्लिक करावे.

"Please enter Valid DEB-ID" अशी त्रुटी उद्भवल्यास, अर्जामध्ये Full Name (As per DEB-ID Website) या रकान्यातील नाव तंतोतंत DEB-ID वेबसाईटवरील नावाप्रमाणेच असल्याची खात्री करावी. नसेल, तर ते पुन्हा टाईप करून Next वर क्लिक करावे.

तरी देखील, "Please enter Valid DEB-ID" अशी त्रुटी पुन्हा येत असेल तर, student.sol@unipune.ac.in या ईमेल-आयडीवर संपर्क करावा.


<u>Next Steps:</u>

अर्जातील एकूण १० प्रकारचे तपशील पूर्ण भरून घ्यावेत. सदर तपशील भरताना कोणतीही तांत्रिक अडचण येत असल्यास, student.sol@unipune.ac.in या ईमेल-आयडीवर संपर्क करावा.

अर्जामध्ये ज्या ठिकाणी * आहे, असा तपशील भरणे आवश्यक आहे. अन्य तपशील वैकल्पिक असून तो भरणे अनिवार्य नाही.

Qualification details मध्ये माहिती भरताना M.A. / M.Com. साठी प्रवेश घ्यावयाचा असल्यास पदवीचा (Degree) तपशील भरणे आवश्यक आहे, आणि, B.A. / B.Com. साठी प्रवेश घ्यावयाचा असल्यास इयत्ता १२वी / पदविका (diploma) तपशील भरणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी इयत्ता १२ वीची परीक्षा CBSE / ICSE / NIOS या शिक्षण मंडळातून उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी तपशील भरताना 'दिल्ली' राज्य निवडावे.

# अभ्यासक्रमास अर्ज करणे (Apply for Programme)




1) अर्जामध्ये वरील बाजूस उजव्या कोपऱ्यातील Important Links वर क्लिक करून पुढे Apply for Program वर क्लिक करावे.
2) आपणास अर्ज करावयाच्या अभ्यासक्रमाचे नाव शोधून त्यापुढील Apply वर क्लिक करून Yes वर क्लिक करावे.
3) चौकोनावर (checkbox वर) क्लिक करून Next वर क्लिक करावे.
4) पुन्हा Next वर क्लिक करावे.
5) यादीमधील विद्यार्थ्यास निवडावयाच्या अभ्यास केंद्राच्या नावापुढील Select वर क्लिक करावे.
   (अभ्यास केंद्राचे नाव काळजीपुर्वक निवडावे, एकदा निवडलेले अभ्यास केंद बदलता येत नाही.)
6) अध्ययनाचे माध्यम (मराठी/इंग्लिश) निवडावे, विषय निवडावेत आणि Next वर क्लिक करावे.
7) पुन्हा Next वर क्लिक करून Submit वर क्लिक करावे.
8) Make Payment वर क्लिक करून Yes वर क्लिक करावे.
9) Submit वर क्लिक करून ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरावे.
   (ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरण्यासाठी युपीआय / कार्ड/ नेट बँकिंग हे पर्याय उपलब्ध आहेत.)
10) शुल्क भरल्यानंतर Download Form वर क्लिक केल्यास प्रवेश अर्ज पीडीएफ फॉरमॅटमध्ये डाऊनलोड होईल.
    (बँक अकाऊंटमधून पैसे वजा होऊनदेखील, प्रवेश अर्ज डाऊनलोड होत नसेल तर, पुन्हा शुल्क भरू नये. अशा वेळेस २४ तासांनंतर प्रवेश अर्ज डाऊनलोड होईल. शुल्क भरून २४ तासांनंतरदेखील प्रवेश अर्ज डाऊनलोड न झाल्यास student.sol@unipune.ac.in यावर संपर्क करावा.
11) प्रवेश अर्ज डाऊनलोड झाल्यानंतर ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल.

## प्रवेशअर्ज पडताळणी (Application Scrutiny)

प्रवेशअर्ज डाऊनलोड केल्यानंतर विद्यार्थ्यास लॉगीनमध्ये Application is Under Scrutiny असे दिसेल. प्रवेशअर्जाची प्रिंट काढून ती आवश्यक त्याकागदपत्रांसह त्याने निवडलेल्या अभ्यास केंद्रावर जमा विहित मुदतीत जमा करणे आवश्यक आहे. (याबाबतची सविस्तर सूचना संकेस्थळावर देण्यात आली आहे.) अभ्यास केंद्र प्रवेश अर्ज व कागदपत्रे तपासून प्रवेश अर्ज पडताळणी पुर्ण करेल आणि विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित करेल. त्यानंतर अभ्यास विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक केंद्राच्या व्हॉट्सअॅप/ टेलिग्राम ग्रुपमध्ये समाविष्ट करेल आणि सदर ग्रुपमधून विद्यार्थ्यास पुढील माहिती वेळोवेळी मिळेल.

## विषय/ अध्ययनाचे माध्यम बदलण्याबाबत:

१) अध्ययनाचे माध्यम (मराठी/ इंग्रजी) बदलायचे असल्यास सत्र-१ परीक्षेपूर्वीच बदलता येईल. त्यानंतर माध्यम बदलता येणार नाही.

२) बी.ए., बी.कॉम. व एम.कॉम. याअभ्यासक्रमासप्रवेशित विद्यार्थ्यांना सत्र-१ परीक्षेपूर्वी नियमानुसार विषय बदलता येईल. सत्र-१ परीक्षेनंतर अनुत्तीर्ण असलेलेच विषय नियमानुसार बदलता येतील. उत्तीर्ण असलेले विषय बदलता येणार नाहीत.

३) विषय अथवा अध्ययनाचे माध्यम बदलण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यास केंद्रामार्फत दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.